अॅग्रोमेटअॅडवायझरी बुलेटीन
ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
कृषि हवामानशास्त्र विभाग
कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५

फोन : ०२०-२९५१६२६४ ई-मेल : amfupune@gmail.com

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०१/०९/२०२६

## जिल्हा : जळगाव

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०१/०९/२०२६ ते ०५/०९/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| पाऊस (मिमी) | 2.0 | 3.0 | 8.0 | 10.0 | 4.0 |
| कमाल तापमान (अं.सें.) | 32 | 33 | 31 | 30 | 31 |
| किमान तापमान (अं.सें.) | 22 | 23 | 24 | 23 | 22 |
| ढग स्थिती (आकाश) | 7 | 8 | 8 | 8 | 6 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 84 | 83 | 92 | 93 | 94 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 66 | 67 | 74 | 82 | 81 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 12 | 12 | 14 | 12 | 9 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 266 | 360 | 264 | 263 | 258 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०१, ०२ व ०५ सप्टेंबर, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी तर दिनांक ०३ व ०४ सप्टेंबर, २०२६ रोजी काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०३ व ०४ ऑगस्ट, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जना, विजासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०६ ते १२ सप्टेंबर, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • हुमणी कीड : हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ , बोर, लिंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावेत व रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या करावा. त्यामुळे अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट होईल. हुमणी अळीच्या जैविक नियंत्रणासाठी मेटारिझीयम अॅनिसोप्ली परोपजीवी बुरशी २० कि. प्रति हेक्टर जमिनीत मिसळावे (शेणखतामध्ये मिसळून टाकता आल्यास उत्तम).<br>• सर्व उभ्या पिकांना ढगाळ हवामानामुळे किड व रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास फुले बायोमिक्स ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी. तसेच सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असल्यास पेरणीनंतर पीक फुलोरा अवस्थेत फुले ग्रेड II ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल अॅपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल अॅपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• पावसाच्या खंडांमुळे पिकांना ओलाव्याचा ताण जाणवत असेल आणि पाणी उपलब्ध असेल तर संरक्षित पाणी द्यावे अथवा २ टक्के युरिया किंवा पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी. |
| कापूस | पाते धरण्याची ते फुलोरा अवस्था | रस शोषक किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी निंबोळी अर्क फवारणी सारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात आणि प्रति एकर ८ ते १० पिवळे चिकट सापळे वापरा वेत. पांढरी माशीच्या नियंत्रणासाठी फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू. जी. २ ग्रॅम किंवा डायफेन्थुरॉन ५० डब्लु पी. १२ ग्रॅम किंवा बुप्रोफेझीन २५ एस.सी. २० मिली किंवा निंबोळी अर्क ५० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. पिक ८०-९० दिवसाचे झाले असल्यास पिकाचा मुख्य शेंडा खुडावा. फुल किंवा पाते गळ होत असेल तर नॅप्थालिक अॅसिड १०० मिली ५०० लिटर पाण्यात प्रती हेक्टरी फवारावे. |
| सोयाबीन | फुलोरा अवस्था | ढगाळ हवामानामुळे रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी तसेच मावा किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी फ्लोनिकामिड ५०% डब्लू. जी. ४ ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणे पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. किडींची आर्थिक नुकसान पातळी पाहूनच फवारणी करावी. पिकातील मोठे तण काढून ध्यावे त्यामुळे किड व रोगाचे प्रमाण आटोक्यात ठेवण्यास मदत होईल. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी फ्ल्यूबेंडीअमाईड ३९.३५ % एस.सी., ३ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| मुग/उडीद | शेंगा भरण्याची | मुगाच्या शेंगा पक्व झाले असल्यास त्याची पहिली तोडणी करून घ्यावे. |

| | | |
|---|---|---|
| | अवस्था | |
| **भुईमूग** | फुलोरा अवस्था | आऱ्या जमिनीत जाण्यास सुरुवात झाल्यावर ४५ दिवसाच्या पुढे आंतरमशागतीची कामे करू नयेत. रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ८ ते १० पिवळे चिकट सापळे तसेच ८-१० कामगंध सापळे प्रति एकर लावावेत. फुलोरा ते आऱ्या तयार होण्याच्या अवस्थेमध्ये ८० किलो जिप्सम प्रति एकरी टाकावे. आऱ्या विकसित झाल्या असतील तर उपट्या आणि निम पसऱ्या जातीमध्ये मोकळा ड्रम फिरवून घ्यावा. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २ मिली प्रती लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **मका** | पीक वाढीची अवस्था | किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ८-१० कामगंध सापळे प्रति एकर लावावेत. अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी स्पिनेटोरम ११.७ टक्के एससी ५ मिली किंवा ब्रोफ्लानिलाइड २० टक्के एससी २.५ मिली किंवा आयसोयायक्लोसेरॅम १८.१ एससी ६ मिली किंवा इमामेक्टिन बेंझोएट १.५ टक्के + प्रोफेनोफोस ३५ टक्के डब्लुडीजी १५ ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **वांगी** | पीक वाढीची अवस्था | रस शोषणाऱ्या (तुडतुडे) किडीच्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५% ई.सी.४ मिली किंवा फ्लोनीकॅमिड ५० टक्के डब्लु. जी. ४ ग्रॅम किंवा ॲफिडोपायरोपेन ५० डी.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | करपा (सिगाटोका) रोगाच्या नियंत्रणासाठी<br>*रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून जाळावीत.<br>* पहिली फवारणी २५ ग्रॅम मॅन्कोझेब ७५% डब्ल्यू.पी. किंवा २५ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० टक्के डब्लु. पी. दुसरी फवारणी प्रोपिकोनॅझोल ५ मिली + मिनरल ओईल १०० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>* कुकुंबर मोझेक (इंन्फेक्शीअश) विषाणू रोगाच्या नियंत्रणासाठी प्रार्दुभाव दिसताच रोगग्रस्त झाड उपटून दूर ठिकाणी नेऊन जाळून किंवा जमिनीत गाडून नष्ट करावीत. या रोगाचा प्रसार मावा किडीमार्फत होत असल्याने नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रीड ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>* कंद सड जीवाणूजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी ब्लिचिंग पावडर ४ ग्रॅम प्रती १/२ लिटर पाण्यामध्ये मिसळून प्रती झाड आळवणी करावी.<br>लागवडीनंतर २ महिन्यानंतर जस्त या सूक्ष्म अन्नद्रव्याची ५० ग्रम प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| **बोर** | पीक वाढीची अवस्था | ढगाळ वातावरणामुळे भुरी रोगा च्या नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | जनावर विल्यानंतर पहिले चार दिवस जवळपास २ किलो गव्हांडा , दिड किलो गूळ , २ चमचे मीठ व क्षारयुक्त मिश्रण द्यावे. पहिले तीन महिने दिवसातील संपूर्ण २८ ते ३० किलो आहार तीन वेळा विभागून दिल्यास दूध उत्पाद न चांगल्या प्रकारे मिळते. रोजच्या शरीर पोषणासाठी जवळजवळ एक ते दिड किलो देशी गायींसाठी , तर २ किलो खुराक संकरित गाय किंवा म्हशीसाठी द्यायला हवा. दुधाळ जनावराला वजनाच्या २ ते ३.५ टक्के सुका चारा द्यावा. प्रती तीन लिटर दुधामागे प्रत्येक दिवशी एक ते दीड किलो जास्तीचा खुराक द्यावा. दुधाळ गायी व म्हशीला दररोज १५ ते २० किलो हिरवा चारा बारीक तुकडे करुन , तसेच ४ ते ८ किलो सुका चारा दिल्यास दुग्ध उत्पादनात फायदा मिळू शकतो.<br>आहारामध्ये जास्त प्रथिने, खनिज मिश्रण असलेले खाद्य द्यावे. खनिजांचा पुरवठा होण्यासाठी शेवग्याच्या झाडाचा पाला दिल्यास फायदा होतो दररोज २० ग्रॅम खनिज मिश्रण खाद्यातून दिल्यास दुध उत्पादन वाढते. याशिवाय मुबलक प्रमाणात स्वच्छ पाणी पाजावे. दूध एकाच माणसाच्या हाताने ठरावीक वेळेतच व समान अंतराने काढावे. शेवटची धार पूर्णपणे काढावी. त्यात स्निग्धांशांचे प्रमाण वाढते. जनावरे आणि गोठा स्वच्छ ठेवावा अशा प्रकारे काळजी घेतल्यास दुध उत्पादन वाढण्यास मदत होते. |

***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान : -**
**ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : ०१.०९.२०२६**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**